# अंतिम वर्ष परीक्षांना विद्यापीठातर्फे प्रारंभ

## ऑनलाईन परीक्षार्थींची संख्या सर्वाधिक

**कोल्हापूर, ता. २७ :** शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांना आज सुरवात झाली. सुमारे १५ अभ्यासक्रमांच्या परीक्षा आज झाल्या. एकूण विद्यार्थ्यांपैकी ऑनलाईन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वाधिक होती. ऑफलाईन परीक्षाही त्या-त्या केंद्रावर पार पडल्या. नियोजित वेळापत्रकाप्रमाणे उद्याही (ता. २८) परीक्षा होणार आहेत.

सकाळी ११ ते १२, १.३० ते २.३० आणि ४ ते ५ या कालावधीत पेपर झाले. ऑनलाईन पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांना सॉफ्टवेअरच्या माध्यमातून त्यांनी दिलेल्या ई-मेलवर तसेच मोबाईलवर क्रमांकावर लिंक पाठवण्यात आली. विद्यार्थ्यांनी बहुपर्यायी प्रश्नपत्रिका सोडवून ती सबमीट केली. ऑफलाईन पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा त्यांना दिलेल्या परीक्षा केंद्रावर झाली. येथे विद्यार्थ्यांना सोशल डिस्टन्सिंग पाळून बसवण्यात आले होते. ९८.४४ टक्के विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. आज झालेल्या परीक्षांमध्ये बी व्होक, व्यवस्थापन शास्त्र, औषध निर्मिती अभ्यासक्रम, अंतर्गत गृहसजावट पदवी अभ्यासक्रम यांच्या परीक्षा झाल्या. ज्या विद्यार्थ्यांना तांत्रिक अडथळ्यांमुळे परीक्षा देता आली नसेल. किंवा ज्या विद्यार्थ्यांना कोरोनाची लागण झालेली असेल त्यामुळे परीक्षा देता आली नसेल. त्यांची पुन्ही परीक्षा घेतली जाईल. मात्र अन्य अनुपस्थित विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जाणार नाही. असे परीक्षा विभागाने सांगितले आहे.

### परीक्षा दृष्टिक्षेपात

**(आकडेवारी एका दिवसाची)**

- एकूण विद्यार्थी- १८०२
- परीक्षा दिलेले विद्यार्थी- १७७४
- ऑनलाईन परीक्षा देणारे विद्यार्थी- १६९०
- ऑफलाईन परीक्षा देणारे विद्यार्थी- ८४
- गैरहजर विद्यार्थी- २८

# विद्यापीठाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा सुरू

## १७७४ परीक्षार्थी : परीक्षेबाबत तक्रार नाही

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** तीनवेळा लांबणीवर पडलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम सत्र, वर्षाच्या परीक्षा मंगळवारपासून सुरू झाल्या. पहिल्या दिवशी ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने एकूण १७७४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. विविध १८ विषयांच्या ९९ टक्के विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली. ही परीक्षा विना तक्रार पार पडली.

कर्मचाऱ्यांचे आंदोलन, अतिवृष्टी, बी.एड्. सीईटी या कारणांमुळे ऑक्टोबरमध्ये विद्यापीठाकडून तीनवेळा अंतिम सत्र, वर्षाची परीक्षा पुढे ढकलण्यात आली होती. नव्या वेळापत्रकानुसार मंगळवारपासून परीक्षा सुरू झाली. या परीक्षेचे पहिल्या दिवशी १८ अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी १८०२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १७७४ जणांनी परीक्षा दिली.

### आकडेवारी दृष्टिक्षेपात

**१६९०**
ऑनलाईन परीक्षार्थी

**८४**
ऑफलाईन परीक्षार्थी



**२८**
एकूण गैरहजर परीक्षार्थी

ऑफलाईन परीक्षा ही महाविद्यालयांमध्ये झाली. त्यात बी. व्होकसह अन्य काही अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांचा समावेश होता. सकाळी ११ ते दुपारी १२, दुपारी १.३० ते २.३० आणि दुपारी ४ ते सायंकाळी पाच यावेळेत परीक्षा झाली. दरम्यान, परीक्षेबाबत तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास त्याचे निराकारण करण्यासाठी स्थापन केलेला आपत्ती निवारण कक्ष हा संख्याशास्त्र विभागाच्या प्रयोगशाळेत कार्यान्वित झाला.

# अंतिम वर्षाच्या परीक्षा सुरळीतपणे सुरू

## १,७७४ विद्यार्थी हजर; तीन सत्रात परीक्षा



शिवाजी विद्यापीठातून...

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ अंतिम वर्ष शेवटच्या सत्र परीक्षा मंगळवार (दि. २७) पासून ऑनलाईन, ऑफलाईन पद्धतीने सुरळीतपणे सुरू झाल्या आहेत. पहिल्या दिवशी १,८०२ पैकी १,७७४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांत आजपासून तीन सत्रांत ऑनलाईन, ऑफलाईन परीक्षा सुरू झाल्या आहेत. पहिल्या दिवशी १,८०२ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. ऑनलाईन परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना यूजर आयडी व पासवर्ड देण्यात आला होता. त्यानुसार मोबाईल, लॅपटॉप, संगणकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. ऑफलाईन परीक्षा महाविद्यालय आणि विद्यापीठातील अधिविभाग स्तरावर घेण्यात आल्या. विद्यापीठाच्या वतीने दोन तास अगोदर महाविद्यालयांना १० हून अधिक अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिका 'एसआरपीडी' मोडद्वारे पाठविण्यात आल्या. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना मास्क, सॅनिटायझर बंधनकारक करण्यात आले होते. सोशल डिस्टन्सिंगचे पालन करून परीक्षा हॉलमध्ये बैठक व्यवस्था करण्यात आली होती.

पहिल्या सत्रात एम.एस. डब्ल्यू., बी.एस.डब्ल्यू., एम.आर. एस., बी.व्होक., एम.बी.ए. (रूरल मॅनेजमेंट), दुसऱ्या सत्रात बी.फार्मसी आणि तिसऱ्या सत्रात बॅचलर ऑफ ड्रेस मेकिंग अँड फॅशन कॉर्डिनेशन, बॅचलर ऑफ मल्टिमीडिया, बॅचलर ऑफ इंटिरिअर डिझाईन आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. १,६९४ पैकी १,६९० विद्यार्थ्यांनी ऑनलाईन, तर १०८ पैकी १०४ विद्यार्थ्यांनी ऑफलाईन परीक्षा दिली. परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी ९९.५६ इतकी आहे. विद्यार्थ्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणीचे परीक्षा विभाग, कॉल सेंटर व महाविद्यालय समन्वयकामार्फत निराकरण करण्यात आले, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.



कोल्हापूर : वाचनकट्टा संस्थेतर्फे झालेल्या पुस्तक प्रकाशनावेळी डावीकडून युवराज कदम, प्रा. टी. के. सरगर, सिराज शिकलगार, संजय पाटील, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रा. रेखा निर्मळे-चौगुले, प्रा. निगार मुजावर.

# वाचकांच्या आवडीनुसार लेखकांनी लिहायला हवे

## डॉ. डी. टी. शिर्के : 'वाचनकट्टा'तर्फे पुस्तकांचे प्रकाशन

आर. के. नगर, ता. २७ : 'हल्लीच्या धावपळीच्या युगात वाचकांची संख्या वाढत असल्याचे समाधानकारक चित्र पाहायला मिळत आहे. या दृष्टीनेच लेखकांनी वाचकांच्या बदलत्या आवडीनुरूप लेखन करावे. जेणेकरून चांगल्या प्रकारचे लिखाण वाचकांसाठी उपलब्ध होईल,' असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले. वाचनकट्टा प्रकाशन संस्थेतर्फे आयोजित सिराज करीम शिकलगार लिखित 'आई, ती आणि एकत्र कुटुंबपद्धती', प्रा. रेखा निर्मळे-चौगुले व प्रा. निगार मुजावर लिखित 'रिसर्च मेथडॉलॉजी' आणि संजय पाटील व युवराज कदम संपादित 'निबंध' या पुस्तकांच्या प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू दालनात या सोहळ्याचे आयोजन झाले.

'आई, ती आणि एकत्र कुटुंबपद्धती' या पुस्तकात शिकलगार यांनी सामाजिक जडणघडणीचा आणि एकूणच बदलती कुटुंबपद्धती तसेच संस्कृतीचा आढावा घेतला आहे. 'निबंध' या पुस्तकात कोरोना कालखंडात 'वाचनकट्टा'तर्फे घेतलेल्या निबंध स्पर्धेतील सहभागी निबंधांचे संपादन केले आहे. 'रिसर्च मेथडॉलॉजी' या पुस्तकात सेट व नेट परीक्षांबद्दलचे अद्ययावत ज्ञान व प्रश्न यांचा समावेश आहे.

वाचनकट्टा संस्थेचे संस्थापक युवराज कदम, उपप्राचार्य प्रा. टी. के. सरगर, एस. डी. पाटील, डॉ. सचिन चौगुले, जिल्हा परिषद सदस्य सुभाष सातपुते, रियाज मुजावर, बसंत चौगुले, ऋतिक पाटील, सचिन लोंढे-पाटील आदी उपस्थित होते.